# शिवाजी विद्यापीठाने बदलले एम.बी.ए. अभ्यासक्रमाचे स्वरूप



**बदलत चाललेला काळ, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उद्योगधंद्याच्या व व्यापाऱ्यांच्या गरजा त्याचप्रमाणे भारतातील उच्च शिक्षण नियंत्रित करणाऱ्या यूजीसी, एआयसीटीई व डीटीई आदी शासकीय विभागांच्या अपेक्षा लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाने एमबीएच्या अभ्यासक्रमात आमूलाग्र बदल केले आहेत. ते तरुणांना नव्या शैक्षणिक प्रवाहात अग्रेसर ठेवण्यात मदत करतील. नव्या बदलांना सामोरे जात असताना विद्यार्थ्यांना उद्योगधंद्यांना व विस्तारित होणाऱ्या सेवा क्षेत्रांना अपेक्षित अशी कौशल्ये प्रदान करण्यात येणार आहेत. सर्वांगीण विकास आणि उद्योजकीय कौशल्यांनी परिपूर्ण असे मनुष्यबळ नव्या एमबीएमुळे निर्माण होणार आहे.**

**डॉ. सारंग भोला**

एमबीएचा नवा अभ्यासक्रम हा एआयसीटीईच्या मॉडेल क्युरिक्युलमचा आधार घेऊन तयार केला असल्यामुळे राष्ट्रीय स्तरावरील अभ्यासक्रमाशी तो सुसंगत झाला आहे. नोकरीच्या व स्वयंरोजगाराच्या जास्तीत जास्त संधी आता सेवा क्षेत्रात उपलब्ध असल्यामुळे सेवा क्षेत्रात विशेष नैपुण्य प्राप्त होण्यासाठी हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट हे नवे स्पेशलायझेशन देऊ केले आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारामधील संधी पाहता त्या क्षेत्रातील ज्ञान प्राप्तीसाठी इंटरनॅशनल बिझनेस हे स्पेशलायझेशन देऊ केले आहे.

ज्या तरुणांना नव्याने

आहेत, किंबहुना असलेले उद्योगधंदे वृद्धिंगत करावयाचे आहेत, त्यांच्यासाठी आंत्रप्रिन्युअरशीप डेव्हलपमेंट हे स्पेशलायझेशन नव्याने निर्माण केले आहे. हे करत असताना मार्केटिंग मॅनेजमेंट, फायनान्शियल मॅनेजमेंट, ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट, प्रोडक्शन मॅनेजमेंट, सिस्टीम्स मॅनेजमेंट आणि अॅग्रीकल्चर बिझनेस मॅनेजमेंट हे प्रस्थापित अस्तित्वात असलेले स्पेशलायझेशन आणखी दर्जेदार स्वरूपात देऊ केले आहेत.

एमबीएच्या विद्यार्थ्यांना एकाच वेळी दोन स्पेशलायझेशन देऊ करणारे शिवाजी हे महाराष्ट्रातील एकमेव विद्यापीठ आहे. यामुळे विद्यार्थ्यांना एकमेकास पूरक असे विषय निवडता येतात. त्याचबरोबर बदलत्या परिस्थितीत करिअरमध्ये मार्गक्रमण करताना आवडीप्रमाणे आणि उपलब्ध संधी पाहून स्पेशलायझेशनुसार करिअरच्या अधिक संधी शोधता येतात. नवीन अभ्यासक्रमात एमबीए पूर्ण झाल्यानंतरसुद्धा जर अधिकचे स्पेशलायझेशन करावयाचे असेल तर ते करण्याची सोयही या अभ्यासक्रमात केलेली आहे, हे याचे आणखी एक वैशिष्ट्य.

नव्या एमबीएच्या अभ्यासक्रमात सैद्धांतिक अभ्यासाचा भार कमी करून प्रात्यक्षिकांवर अधिक भर देण्यात आलेला आहे. प्रत्येक विषयाच्या प्रत्येक टॉपिकवर प्रॅक्टिकल देण्यात आलेले असून प्रत्येक सेमिस्टरमध्ये एक विषय केवळ कौशल्य वृद्धीसाठीच राखून ठेवण्यात आलेला आहे. ज्यात विद्यार्थ्यांचे सॉफ्ट स्कील्स, प्रभावी व्यवस्थापनविषयक कौशल्ये, रोजगाराभिमुख कौशल्ये यांच्यावर विशेष भर देण्यात आलेला आहे. प्रत्येक सत्रात दिलेल्या सहा विषयांच्या यादीतून एक आवडीचा विषय निवडण्याची मुभा विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमात देण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांवरील अभ्यासाचा ताण कमी करून व्यावहारिक कौशल्यवृद्धी करण्याचा प्रयत्न या अभ्यासक्रमात करण्यात आला आहे.

एमबीएच्या परीक्षा पद्धतीतही व्यवहार्य बदल केले आहेत. ६० गुणांची विद्यापीठ परीक्षा, २० गुणांची ऑनलाईन मल्टिपल चॉईस परीक्षा आणि ३० गुणांचे अंतर्गत गुण, अशी १०० गुणांची परीक्षा होणार आहे. सन २०१६ पासूनच अंतर्गत गुणांसाठी शिवाजी विद्यापीठाने ओपन बुक एक्झामिनेशन सुरू केली. नव्या अभ्यासक्रमात अंतर्गत मूल्यमापनाबरोबरच विद्यापीठ परीक्षांमध्ये फक्त स्पेशलायझेशन पेपर्ससाठी ओपन बुक एक्झामिनेशन देऊ केली आहे.

विद्यापीठ परीक्षांसाठी ओपन बुक एक्झामिनेशनचा पर्याय देऊ करणारे शिवाजी विद्यापीठ महाराष्ट्रातील एकमेव विद्यापीठ आहे. शिक्षकांसाठीसुद्धा कालबाह्य प्रशिक्षणाची व्यवस्था या अभ्यासक्रमात केली आहे. जेणेकरून शिक्षक व्यापार, सेवा व उद्योगांमधील प्राप्त परिस्थिती व बदल विद्यार्थ्यांसमोर योग्य रीतीने मांडू शकतील. यूजीसीच्या अपेक्षा लक्षात घेऊन व विद्यार्थ्यांना अधिकचे शैक्षणिक स्वातंत्र्य देण्याच्या उद्देशाने स्वयंम व मूक (MOOC) हे ऑनलाईन अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना करता येणार असून नवीन अभ्यासक्रमातील अंतर्गत विषयांच्या बदली हे विषय घेता येतील, अशी व्यवस्था या अभ्यासक्रमात करण्यात आली आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या आणि ज्यांच्या नावे हे विद्यापीठ आहे, त्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्धनीती, राजकारण, स्वराज्य, व्यवस्थापन, अर्थनीती इत्यादींचा परिचय एमबीएच्या विद्यार्थ्यांना करवून देण्यासाठी 'छत्रपती शिवाजी महाराज - द मॅनेजमेंट गुरू' हा विषय अभ्यासक्रमात देणारे शिवाजी विद्यापीठ केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील पहिले विद्यापीठ ठरले आहे.

(लेखक शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन अभ्यास मंडळाचे अध्यक्ष असून कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च सातारा येथे कार्यरत आहेत.)

# कुलगुरू डॉ. शिंदे यांचा सत्कार

कोल्हापूर टाइम्स टीम

'कोल्हापूरच्या पूर परिस्थितीत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ प्रशासनाने माणुकसकीचे दर्शन घडवले' असे गौरवोदगार सामाजिक कार्यकर्ते किसन कल्याणकर यांनी काढले.

बी वॉर्ड अन्याय निवारण कृती समिती व हुतात्मा क्रांती सामाजिक संस्था यांच्यावतीने शिक्षकदिनाचे औचित्य साधून डॉ. देवानंद शिंदे यांचा कल्याणकर यांच्याहस्ते छत्रपती संभाजी महाराज हा ग्रंथभेट देऊन सत्कार करण्यात आला. समितीचे अध्यक्ष रामेश्वर पत्की म्हणाले, 'पूरकाळात विद्यापीठाने साडेतीनशे प्रवाशांना निवारा दिला. शहरातील सर्व भागात मागणीनुसार मोफत पाणी दिले. जनावरांना चारा उपलब्ध करून दिला.' कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदेवडेकर, राम तुपे, अजय आयरेकर, पृथ्वीराज जगताप यांच्यासह संस्थेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# विद्यापीठात विदेशी भाषा विभागातर्फे ‘मुक्त संवाद’ कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभाग हा भारत व रशिया यांच्यातील सांस्कृतिक बंध असून, रशियन भाषा अभ्यासक्रमाच्या माध्यमातून हा बंध अधिक दृढ होत आहेत, असे प्रतिपादन मॉस्को स्टेट युनिव्हर्सिटीचे प्रा. डॉ. द्मीत्री सकलोव्ह (रशिया) यांनी केले.

विदेशी भाषा विभागातील रशियन भाषेच्या विद्यार्थ्यांशी ‘मुक्त संवाद’ कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी रशियातील दैनंदिन जीवन, पाककला, कुटुंब व विवाह पद्धती या संदर्भातील अनेक विषयांवर विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना डॉ. सकलोव्ह यांनी उत्तरे दिली. डॉ. मार्गारिटा रेमीजव्हा यांनी रशियन स्त्रीने जीवनाच्या सर्व क्षेत्रात स्वत:चे स्थान निर्माण केले आहे. रशियन स्त्री एक अतिशय कणखर व स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असल्याचे त्यांनी सांगितले. विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी प्रास्ताविक केले. याप्रसंगी सहयोगी शिक्षिका शीतल कुलकर्णी व प्रियांका माळकर उपस्थित होत्या.

# एनएसएस स्वयंसेवकांनी

# दिले जीवदान





**महेश कांबळे**
सीसीआर

**कोल्हापूरसह पश्चिम महाराष्ट्राने अनुभवलेल्या प्रलयंकारी महापुराच्या कटू आठवणी कोल्हापूरकराच्या मनावर कायमच्या कोरल्या गेल्या आहेत. महापुराच्या संकटात एनडीआरएफ आणि लष्करच्या जवानासोबत शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी महत्त्वाची भूमिका बजावली. महापुरात अडकून पडलेली नागरिकांना मोठ्या धाडसाने आणि घेतलेल्या प्रशिक्षणच्या बळावर मृत्यूच्या दाढेतून सहीसलामत बाहेर काढले.**

६ ऑगस्ट ते ९ ऑगस्ट या कालावधीमध्ये कोल्हापूर शहराला महापुराने वेढा दिला. याच दरम्यान या स्वयंसेवकांनी आपण आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी लागणारे प्रशिक्षण राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथून पूर्ण केल्याची नोंद जिल्हाधिकारी कार्यालयातील आपती व्यवस्थापन याच्याकडे केली. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात असणाऱ्या गुडघाभर पाण्यातून वाट काढत ही नोंद केल्याचे स्वयसेवक सांगतात. नोंद केल्याच्या दुसऱ्याच दिवशी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यांनी संपर्क करून जिथे मदतीची गरज आहे, अशा ठिकाणी राष्ट्रीय सेवा योजनेच्या टीमना पाठवण्यात आले. यामध्ये शहरातील बापट कॅम्प, रंकाळा टॉवर परिसर, शाहूपुरी, कुंभारगल्ली, रमणमळा या ठिकाणावर अडकून पडलेल्या नागरिकांची सुटका करण्याचे आव्हान या प्रशिक्षित स्वयंसेवकांनी लीलया पेलले. तहान-भूक हरवून एकाच ठिकाणी चार-चार तास कमरेपर्यंत पाणी असलेल्या प्रत्येक ठिकाणी जाऊन परिस्थितीचे गांभीर्य नागरिकांना सांगून त्यांना धीर देण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकानी केले आहे.

प्रशिक्षण घेताना गिरवलेले धडे अशा नैसर्गिक आपतीच्या कालावधीमध्ये उपयोगी पडतात. तसेच गरोदर महिलांना बाहेर काढणे, प्रवाहाच्या विरुद्ध पोहत बचाव कार्य करणे, साप पकडण्याचे तसेच काही इजा झाल्यास तातडीने प्रथमोपचार करण्याचे प्रशिक्षण ही या विद्यार्थ्यांना दिले जाते. महापुरात बापट कॅम्पमधील एका इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर एका कुटुंबातील व्यक्तीना बाहेर काढतांना त्याच्यासोबत तीन महिन्याचे बालक ही होते, सर्वांना बाहेर काढून बोटीत बसवत असताना बोट पाण्याच्या प्रवाहात वाऱ्याने कलंडली, यामध्ये थर्माकोलच्या पेटीमध्ये असणारे बाळ प्रवाहात वाहून जाऊ लागले, ही गोष्ट तिसऱ्या मजल्यावर असणाऱ्या श्रीकांत पाटील याच्या लक्षात आली, त्याने तिसऱ्या मजल्यावरून पाण्यात उडी घेत बालकाला वाचवले.

महापुरादरम्यान नागरिकासह अनेक प्राणी, कुत्री, साप यांनाही राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयसेवक यांनी जीवदान दिले. यामध्ये बारा साप, कुत्री यांचा समावेश आहे. या मोहिमेत मालोजीराजे माने, मोबीन नदाफ, श्रीकांत पाटील, विशाल हाके, विकास नगरपोळे, बिरदेव मासाळ, आशिष माळी, विनायक लोहार आदींनी सहभाग घेतला.

"

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून घेतलेल्या प्रशिक्षणचा फायदा समाजाच्या हितासाठी झाला, याचे खुप समाधान आहे. नैसर्गिक आपत्तीमध्ये नागरिकांना थोडया प्रमाणात तरी बचाव करण्यासाठी प्रशिक्षण मिळायला हवे.

– **श्रीकांत पाटील,** इंग्रजी विभाग, शिवाजी विद्यापीठ

प्रत्येकानी आपत्ती व्यवस्थापणाचे प्रशिक्षण घेऊन स्वतःचा बचाव करून इतरांना मदत करणे गरजेचे आहे. संकटकाळात प्रशासनाचे योग्य सहकार्य मिळाले. समाज कार्यासाठी तरुणाई कुठेच मागे पडताना दिसत नाही, हा सकारात्मक बदल राष्ट्रीय सेवा योजनेमुळे शक्य झाला.

– **मोबीन नदाफ,** इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ